MHKO110009902022

**नियमित दिवाणी दावा क्र. १३२/२०२२ मधील नि. क्र. ४३ खालील आदेश**

**श्रीकांत बळवंत मोरे**

**वि.**

**धनाजी बाबुराव पाटील वगैरे.**

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. २४ यांचे वारस यांना दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २२ रूल ४ प्रमाणे रेकॉर्डवर आणणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. २४ श्रीमती. सखूबाई उर्फ शकुंतला रामचंद्र पवार हे दि. १५.०३.२०२३ रोजी मयत झाली असून त्यांना खालील वारस आहेत-

| अ. क्र. | वारसाचे नाव व पत्ता | प्रतिवादीशी नाते |
|---|---|---|
| १. | संजय रामचंद्र पवार,<br>वय – ५४ वर्षे, | मुलगा |
| २. | संगीता रामचंद्र पवार,<br>वय – ३८ वर्षे,<br>दोघे रा. घर नं. ९५२-क, बी वॉर्ड, दिलबहार तालीमजवळ, रविवार पेठ, कोल्हापूर | मुलगी |

०३. सदरचे वारस सोडून प्रतिवादी क्र. २४ यांना अन्य कोणीही वारस नाहीत. तरी दाव्याचा गुणदोषावर न्यायनिवाडा होणेकरीता प्रतिवादी क्र. २४ यांचे वारस सदर कामी रेकॉर्डवर घेणेची विनंती वादी यांनी केलेली आहे.

०४. प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी त्यांचे म्हणणे दिलेले आहे की, सदरचा अर्ज मुदतीत नसल्यामुळे कायद्याने चालणेस पात्र नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करणे यावा अशी प्रतिवादी विनंती करतात.

०५. प्रस्तुतचा अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदरचा दावा हा वाटपासाठी व स्वतंत्र कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब नि. ४२ खाली माफ करणेत आलेला आहे. तसेच नि. ४१ खाली अबेटमेंटची ऑर्डर सेट असाईड करणेत आलेली आहे. तसेच प्रस्तुत दावा हा वाटपासाठी असल्याने मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिंडींग टाळण्याकरीता व काम गुणदोषांवर चालून निकाली होणेकरीता प्रस्तावित प्रतिवादी क्र. २४(अ) व २४(ब) म्हणजेच प्रतिवादी क्र. २४ चे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, न्यायाच्या कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करत आहे-

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा नि. ४३ खालील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. सदर कामी प्रतिवादी क्र. २४ यांचे वारस अभिलेखावर घेऊन तशी दुरूस्ती या कामी अंतिम आदेशापासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्तीप्रत सदर कामी हजर करावी.

Sd/-
**( आर. एस. मोरे )**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**पेठवडगाव**

**दिनांकः- २६/०३/२०२५.**
**पेठवडगाव**